101

वाचले :- 1.महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८(७) नुसार.
2. मंडल अधिकारी पाटण व उपअभियंता सा.बां.उपविभाग पाटण यांचा दि.03/04/2017 रोजीचे संयुक्त रित्या केलेले मोजमापबाबतचा अहवाल.
3.मंडल अधिकारी पाटण यांचा दि.01/04/2017 रोजीचा पंचनामा.
4.महाराष्ट्र शासन राजपत्र महसूल व वन विभाग अधिसूचना 11 मे 2015.

---

तहसिल कार्यालय पाटण
क्रमांक/गौण खनिज/दंड/एसआर /04/17
पाटण दि. 24/04/2017

## आदेश

ज्याअर्थी मौजे केरळ ता.पाटण येथील पठरावरील माऊली मंदीर शेजारी उत्खनन होत असलेबाबत मे.बॉम्बे पर्यावरण कृती ग्रुप यांनी दि.30/11/2016 रोजी मा.जिल्हाधिकारी सो सातारा यांचेकडे तक्रार अर्ज फोटोसह सादर केलेला आहे. त्याअन्वये सदर ठिकाणी ग.न. 526 यामध्ये मंडल अधिकारी पाटण व उपअभियंता सा.बां.उपविभाग पाटण यांनी दि.03/04/2017 रोजी संयुक्त रित्या मोजमाप केले असता त्यामध्ये 4248 ब्रास जांभा दगड अनाधिकृत उत्खनन केलेचे निदर्शनास आले आहे.

त्यानुसार सदरच्या अनाधिकृत उत्खननबाबत या कार्यालयाकडील नोटीस क्र.गौख/कावि-589/17 दि.07/04/2017 नुसार आपणास दंड का करणेत येऊ नये याबाबत आपले लेखी म्हणने व 4248 ब्रास पैकी आपण किती ब्रासचे स्वामित्वधन शासनास जमा केले आहे याबाबतची चलने इकडे सादर करणेस सांगितले होते. त्याअन्वये आपण दि.12/04/2017 रोजी आपले लेखी म्हणने माझेसमोर सादर केले आहे. आपण दि.14/10/2015 रोजीचे 50 ब्रासचे रक्कम रु.55,000/- दंड भरलेचे चलन सादर केलेले आहे. उर्वरित ब्रासचे आपण उत्खननसाठी परवानगी घेतलेली आहे किंवा नाही याचा बोध होत नाही . सबबआपण 4248 ब्रास उत्खनन केलेले आहे अगर नाही? जर उत्खनन केले असलेस ते किती ब्रास उत्खनन केले व त्यापैकी शासनास किती स्वामित्वधनन जमा केले याचा ही आपल्या म्हणण्यात उल्लेख नाही.

Scanned by CamScanner

त्याअर्थी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम 48(7) अन्वये आपण दंडास पात्र आहे.यास्तव महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम 48(7) अन्वये प्राप्त अधिकारानूसार मी तहसिलदार पाटण असा आदेश देतो की, आपण अनाधिकृत 4248 ब्रास वजा 50 ब्रास असे एकूण 4198 ब्रास जांभा दगड अनाधिकृत उत्खनन केलेने आपणास प्रती ब्रास 100 रु. प्रमाणे 4198 ब्रासची 4,19,800/- रॉयल्टी व चालू बाजार भावा प्रमाणे प्रति ब्रास 1500 प्रमाणे 4198 ब्रासचा दर 62,97,000/- बाजार भावाच्या रकमेच्या 5 पट दंड 3,14,85,000/- असा **एकूण** 3,19,04,800/- रुपये इतका दंड आकारणेत येत आहे.सदर दंडाची रक्कम सात दिवसांच्या आत सरकारी खजिन्यात जमा करावी सदरची रक्कम शासनास मुदतीत जमा न केलेस महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 चे कलम 176 नुसार जमिन महसूलाची थकबाकी समजून वसूलीची कार्यवाही करणेत येईल.

24/4

**तहसिलदार पाटण**

प्रति,

1.श्री.व्दारकोजीराव बाबूराव पाटणकर,
2.श्री.विक्रमसिंह बाळासो पाटणकर,
3.शिवाजीराव बहिरजीराव पाटणकर,
4.कुलकर्णी पावर टुल्स लि.
5.स्वाती विक्रमसिंह पाटणकर
6.मंगलादेवी बाळासो पाटणकर
7.आयर्न उर्फे जयसिंह आबासो पाटणकर
8.अनिता आबासो पाटणकर
9.मंगलादेवी बाळासो पाटणकर
सर्व रा.पाटण ता.पाटण जि.सातारा

अमित बेडके
Bedamit
27/4/17

**प्रत- गाव कामगार तलाठी- केरळ**

सदर आदेशाची प्रत संबंधितास बजावून दिनांकीत पोहोच घ्यावी. तसेच महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 चे कलम 176 नुसार जमिन महसूलाची थकबाकी समजून वसूलीची कार्यवाही पूर्ण करावी.

24/4

**तहसिलदार पाटण**

गा.का तलाठी केरळ
दि. 25/08/2017

Scanned by CamScanner